

जनताश्रम, रत्नागिरी



सन १९३४-३५ मध्ये घर सोडून मुंबईला गेलेले श्रीमहाराज १९४६ साली नोकरी सोडून पुन्हा रत्नागिरीला परतले. मात्र घरात पटेना म्हणून भाड्याची जागा घेऊन स्वतंत्रपणे, एकटेच राहू लागले. हरिभाऊ कुलकर्ण्यांचे कृष्णाश्रम लॉजिंग बोर्डिंग, श्री.आंबर्डेकरांचे श्री समर्थ भोजनालय, श्री.मोरेश्वर मुळे यांचे जनताश्रम अशा वसतीगृहात भाड्याने खोली घेऊन ते राहात असत (आता कृष्णाश्रम आणि श्री समर्थ भोजनालय इमारती अस्तित्वात नाहीत).

या कालावधीत श्रीमहाराजांनी भरपूर साधना केली. त्यांच्या खोलीत अन्य कोणास प्रवेश नसे. दिवसभर बंद खोलीत ध्यानधारण चाले. स्वतःचे वैयक्तिक देवस्थानही सोबत खोलीतच असे. भल्या पहाटे उठून स्नान-संध्या, पूजा आटोपून ध्यान धारणेस बसत. सकाळी १० नंतर व सायंकाळी ६ च्या दरम्यान काही वेळ बाहेर फेरफटका मारीत असत.



१९५१-५२ साली श्रीमहाराज काही दिवस रत्नागिरीला श्री.दत्तोपंत जोश्यांच्या घरीही वास्तव्याला होते. त्याच वेळी श्री.रघुनाथराव जोशीही रत्नागिरीला दत्तोपंतांसमवेत राहात होते. तेथेच श्रीमहाराजांनी रघुनाथरावांचे चिरंजीव श्री.अशोक (श्रीकाका महाराज) यांना प्रथम पाहिले, जवळ बोलावून घेतले, मांडीवर बसविले आणि उपासना मंत्र दिला. या अनपेक्षित घटनाक्रमाने घरची सर्व मंडळी आनंदीतही झाली आणि आश्चर्यचकितही!

श्री. दत्तोपंत जोशी यांचे निवासस्थान



श्री. बापुसाहेब खांडेकर यांचे घर, खानू

१९४९–५० साली खानू, ता. रत्नागिरीचे श्री. बापुसाहेब खांडेकर यांचा श्री. दत्तोपंत आणि रघुनाथराव जोशी यांच्यामुळे श्रीमहाराजांशी परिचय झाला. खानूला बापुसाहेबांच्या घरी जाणे–येणे सुरू झाले. दि. २२/०९/१९५२ रोजी त्यांनी आपले वैयक्तिक देवस्थान खानूला बापुसाहेबांच्या घरी नेले व तेथे माडीवरील एका प्रशस्त खोलीत ते स्थापन केले (घराचे नूतनीकरणानंतर आता ती माडी अस्तित्वात नाही). तेथे भक्तगणांसमवेत उपासना, ध्यानधारणा, उत्सव साजरे करणे इ. होत असे. त्याचप्रमाणे खानूच्या श्रीदेव गांगेश्वर मंदिरातही रात्रौ खूप उशिरापर्यंत ध्यानधारणा चाले.



श्रीमहाराजांचे देवस्थान

१९५५ साली श्री. बापुसाहेब खांडेकरांचे निधन झाले. त्यानंतर श्रीमहाराज खानूला गेले नाहीत. १९५६ साली टिळक आळी (रत्नागिरी) येथील श्री. नारायण शिवराम दीक्षित यांच्या घरी माडीवरील दोन खोल्या (वर्तुळात दाखविलेल्या) भाड्याने घेऊन श्रीमहाराजांनी आपले देवस्थान तेथे स्थापन केले. १९५६ पासूनच श्रीमहाराजांनी पुण्यातील श्रीबाबा महाराजांच्या मंदिराच्या उभारणीस प्रारंभ केला आणि मग रत्नागिरीत फारसे वास्तव्य झाले नाही.



श्री. नारायण शिवराम दीक्षित यांचे निवासस्थान

# ॥ काश्यपीतीरी देववन ॥



श्री गोपाळबुवांना दिलेल्या श्रीस्वामी समर्थांच्या पादुका



श्रीदेव दत्त देवस्थान, सावर्डे



मंदिराचे गर्भगृह



जीर्णोद्धारित मंदिर (१९९२)



सावर्डे येथील नीळकंठ आणि रामचंद्र काशीनाथ शेंबेकर हे बंधूद्वय मार्कंडीच्या श्रीसंत गोपाळबुवा केळकर ऊर्फ श्रीप्रीतिनंद स्वामीकुमार या स्वामी समर्थ परंपरेतील सत्पुरुषांचे शिष्य. श्री गोपाळबुवांनी दिलेल्या श्रीस्वामी समर्थांच्या पादुका या बंधुद्वयांनी आपल्या घरपरड्यात स्थापन करून लहानसे मंदिर बांधले. वस्तुतः हे स्वामी समर्थांच्या पादुकांचे मंदिर, परंतु तेथे दत्त जयंतीच्या दिवशी मोठा उत्सव साजरा होतो म्हणून या मंदिरास, श्रीदेव दत्त देवस्थान असे नांव पडले.

श्री रामचंद्र नरसिंह काटदरे या नावाचे वहाळ, ता. चिपळूण येथील एक गृहस्थ संसार तापाला विटून, गृहत्याग करून या मंदिरासमोर आले. त्यांनी तेथे १४ वर्षे खडतर तपश्चर्या केली, श्रीसंत गोपाळबुवांचा अनुग्रह त्यांना लाभला आणि 'श्री दिगंबरबाबा वहाळकर' या नावाने एक अधिकारी सत्पुरुष म्हणून ते प्रसिद्ध पावले. त्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि स्वामी समर्थांच्या सेवेत उर्वरित आयुष्य याच स्थानात वेचले.

श्रीमहाराजांचा आणि त्यांचा स्नेह १९४२ सालापासूनचा. श्रीमहाराज अनेक वेळा सावर्ड्याला जाऊन या स्थानी राहात आणि वहाळकरबुवांशी आध्यात्मिक चर्चा करीत असत. श्रीमहाराजांना श्रीस्वामी समर्थांनी दर्शन देऊन गोटी दिली ती याच मंदिरात.

१९९२ साली श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टतर्फे या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला.


## श्रीसंत वहाळकरबुवा समाधिमंदिर

दि. १९/०१/१९५१ रोजी श्री वहाळकरबुवांचे महानिर्वाण झाले. त्यांचे अंत्यसंस्कार त्यांच्याच शेत जमिनीत, काश्यपी नदीचे काठी झाले. त्या जागी श्रीमहाराजांनी एक लहानशी मारुतीची घुमटी बांधली. वहाळकरबुवांच्या पश्चात श्रीदेव दत्त देवस्थान आणि त्याच्या व्यवस्थेसाठी वहाळकरबुवांनी खरेदी केलेली जमीन वगैरेंचा ताबा वहाळकरबुवांचे जामात श्री.शेंबेकर यांचेकडे गेला. श्री सीतारामबुवा वालावलकर हे श्री वहाळकरबुवांचे शिष्य. वहाळकरबुवांसमवेत राहून त्यांची आणि देवस्थानची अनेक वर्षे नि:स्पृहपणे सेवा करीत होते. त्यांची काही व्यवस्था करणे आवश्यक होते. म्हणून श्रीमहाराजांनी मारुतीच्या घुमटी शेजारीच श्री वहाळकरबुवांचे समाधिमंदिर उभारले व तेथे राहून श्री सीतारामबुवा वहाळकरबुवांच्या समाधीची सेवा करू लागले. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी श्रीमहाराजांनी 'तळ जितवणे' आणि 'शेरीचा माळ' ही सावर्ड्यातील दोन ठिकाणे विकत घेऊन दिली.

वहाळकरबुवांच्या समाधिमंदिरामागे एक मोठा औदुंबर वृक्ष आहे. त्याच्या तळी श्री सीतारामबुवांनी आपले देवस्थान ठेवले होते. त्यांनी मंदिराशेजारी स्वतः एक विहीर खोदली तसेच आवारात बाग केली.



▲ श्रीमारुतीची घुमटी (जुनी)



▲ औदुंबरतळी श्री सीतारामबुवांनी स्थापन केलेले शिवलिंग



▲ श्रीसंत वहाळकरबुवा समाधिमंदिराची मूळ स्थिती



▲ श्री सीतारामबुवांनी स्वत: खोदलेली विहीर

१९५३ सालापासून श्रीमहाराज तेथे स्वतः उपस्थित राहून पौष शुद्ध ११, १२ या तिथींना पुण्यतिथी उत्सव साजरा करायचे. परंतु पुढे वहाळकरबुवांचे जामात श्री. शेंबेकर यांचे श्रीमहाराज व श्री सीतारामबुवा यांच्याशी मतभेद झाले. ते विकोपाला गेले. शेंबेकर यांनी मारुतीची घुमटीही पाडून टाकली. तेव्हा श्रीमहाराजांनी श्री सीतारामबुवांसाठी हक्काची जागा असावी म्हणून डेरवण येथे जमीन खरेदी करून तेथे सीतारामबुवांसाठी घर बांधण्यास सुरुवात केली. मात्र ते पूर्ण होण्याआधीच दि. १८/०१/१९६९ रोजी सीतारामबुवांनी देह ठेवला. सीतारामबुवांचे कार्य पूर्ण झाल्यावर तेराव्याच दिवशी श्रीमहाराजांनी वहाळकरबुवांच्या समाधिमंदिरातून सीतारामबुवांचे सामान हलवून त्याचा ताबा शेंबेकरांना दिला.

पुढे १५-२० वर्षांनी शेंबेकरांच्या मुलांना आपली चूक उमगून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टला विनंती केल्यावरून, ट्रस्टने १९९९ साली समाधीचा जीर्णोद्धार करून आजचे सुंदर समाधिमंदिर उभे केले.



▲ श्रीमारुतीची घुमटी (जीर्णोद्धारित १९९९ )



▲ श्रीसंत वहाळकरबुवा समाधिमंदिराचा अंतर्भाग



जीर्णोद्धारित मंदिर (१९९९) ▶



▲ श्रीक्षेत्र डेरवण येथील श्रीसंत सीतारामबुवांसाठी बांधण्यात आलेले निवासस्थान



▲ निवासस्थानाजवळील आम्रवृक्षाखाली बांधलेले श्रीमारुती मंदिर



▲ श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिर (पार्श्वभूमीवर निवासस्थान)



▲ श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिर (जीर्णोद्धारित)




▲ श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिर (सभागृह)

श्री सीतारामबुवा मूळचे तेरसे बांबर्डे, ता. कुडाळ येथील. जन्म १८९९. लहानपणापासूनच अंगी वैराग्यवृत्ती, नोकरी सोडून अंगाला राख फासून तीर्थयात्रा करीत फिरत होते. अक्कलकोटला वडाखाली ९ वर्षे श्रीस्वामी समर्थांची उपासना केली, तेव्हा सावर्ड्याला श्री वहाळकरबुवांकडे जाण्याचा त्यांना दृष्टांत झाला. श्री सीतारामबुवा मग सावर्ड्याला आले आणि श्री वहाळकरबुवांच्या आणि मठाच्या सोबत आजन्म राहिले. श्री वहाळकरबुवांच्या निर्वाणानंतर त्यांनी त्यांच्या समाधिमंदिरात राहून सर्व व्यवस्था पाहिली. सद्गुरूंची सेवा, मठाच्या शेतात राबणे, मठाची देखभाल करणे आणि कोरडी भिक्षा मागणे असे व्रतस्थ जीवन ते जगले. मात्र श्री. शेंबेकर यांनी संघर्षाचा पवित्रा घेतल्यानंतर, श्रीमहाराजांनी श्री सीतारामबुवांची वेगळी सोय करण्याचे ठरविले. डेरवण गावातील श्री. मन्यासाहेब बापुसाहेब राजेशिर्के यांची श्री. गुजर यांचेकडे गहाण पडलेली जमीन खरेदी करून तेथे श्री सीतारामबुवांसाठी घर बांधण्यास सुरुवात केली. मात्र घर पूर्ण होण्याआधीच श्री सीतारामबुवांनी देह ठेवला. त्यांचे अंत्यसंस्कार त्या घराजवळच करण्यात आले आणि त्या जागी श्री सीतारामबुवांची समाधी बांधण्यात आली.

श्री सीतारामबुवांच्या घराजवळ एक लहानसे मारुतीचे मंदिर बांधण्याचाही श्रीमहाराजांचा संकल्प होता. त्यासाठी मूर्ती बनविण्यासाठी मुंबईच्या शिल्पकाराला सांगितले होते. परंतु तत्पूर्वी सावर्डे येथील श्री वहाळकरबुवांच्या समाधीजवळील मारुतीची घुमटी शेंबेकर यांनी पाडून टाकल्यामुळे त्यातील मूर्ती आणि श्री सीतारामबुवांचे औदुंबर तळीचे देवस्थान, श्रीमहाराजांनी, श्री सीतारामबुवांच्या घराजवळील संकल्पित मंदिरात स्थापन केले.



▲ श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिर
(गर्भगृह प्रवेशद्वार व गर्भगृह)



श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर ▶

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिरातील भित्तिशिल्पे

## श्रीमद्‌भागवतांतर्गत श्रीकृष्ण-चरित्रातील कथा प्रसंग



पूतनावध



यशोदेला बाल श्रीकृष्ण अवतार प्रचिती देतात



कालिया-मर्दन



महाप्रलय प्रसंगी सागरात एकाकी पहुडलेले श्रीबालमुकुंद



मथुरेच्या राजसभेत मुष्टिक व चाणूराचा वध



असंख्य रूपे धारण करून श्रीकृष्णाची गोपींसह रासक्रीडा



अर्जुन - सुभद्रा विवाह